सकाळ




नेसरी : 'रवळनाथ'च्या नेसरी शाखेचे अध्यक्ष आर. बी. पाटील, सल्लागार, कर्मचारी यांचा सत्कार करताना अध्यक्ष एम. एल. चौगुले. शेजारी डॉ. दत्ता पाटील, डी. के. मायदेव, डॉ. दादासाहेब पाटील, व्ही. के. दळवी, शमा कुरणे, किरण कडोली आदी.

# 'रवळनाथ हौसिंग'च्या नेसरी शाखेचा गौरव

नेसरी, ता. १३ : येथील श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स शाखा नेसरीने ग्रामीण विभागात प्रथम क्रमांक पटकावला. याबद्दल संस्थेतर्फे शाखा पदाधिकाऱ्यांचा विशेष सत्कार झाला. संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले अध्यक्षस्थानी होते. शिवाजी विद्यापीठाचे मराठी अभ्यास मंडळ अध्यक्ष डॉ. दत्ता पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. पाटील म्हणाले, ''नेसरी शाखा अध्यक्ष तथा माजी प्राचार्य आर. बी. पाटीलांचे अभ्यासू कुशल नेतृत्व आणि सल्लागार, कर्मचाऱ्यांची सक्रिय साथ यामुळेच संस्थेच्या लौकिकात भर पडली आहे. संस्थेच्या इतर शाखांनी यातून विशेष प्रेरणा व ऊर्जा मिळेल.'' शाखा अध्यक्ष पाटील म्हणाले, ''सल्लागार, कर्मचाऱ्यांच्या सामूहिक प्रयत्न मुळेच हे यश मिळाले आहे. त्यामध्ये सातत्य राखण्यासाठी प्रयत्न केला जाईल.''

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी डी. के. मायदेव, शाखा सल्लागार डॉ दादासाहेब पाटील, मुख्याध्यापिका शमा कुरणे, शाखाधिकारी किरण कडोळी यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते. शाखा सल्लागार डॉ. व्ही. के. दळवी यांनी आभार मानले.

## कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनपर बक्षीस

रवळनाथच्या एकूण नऊ शाखा असून त्यापैकी शहरी विभागात प्रथम आलेल्या बेळगाव आणि ग्रामीण विभागात प्रथम आलेल्या नेसरी शाखेतील कर्मचाऱ्यांना दरमहा पाचशे रुपयेप्रमाणे प्रत्येकी सहा हजार इतकी रक्कम बक्षीस म्हणून दिली जाईल, अशी घोषणा संस्थापक अध्यक्ष एम. एस. चौगुले यांनी केली.

पुढारी



नेसरी : श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीच्या नेसरी शाखा चेअरमन प्राचार्य आर. बी. पाटील व सर्व शाखा सल्लागारांचा रवळनाथ परिवारातर्फे सत्कार करताना संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले. यांच्यासह अन्य.

# 'रवळनाथ'ची नेसरी शाखा ग्रामीण विभागात अव्वल

**नेसरी : पुढारी वृत्तसेवा**

नेसरी (ता. गडहिंग्लज) येथील श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स ग्रामीण विभागातील शाखांमध्ये प्रथम क्रमांक पटकाविल्याबद्दल संस्थेतर्फे नेसरी शाखा पदाधिकाऱ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच शाखेतील कर्मचाऱ्यांना संस्थेतर्फे रोख बक्षिसांची घोषणा करण्यात आली. येथील नेसरी शाखा कार्यालयात हा कार्यक्रम झाला. संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले अध्यक्षस्थानी होते.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. दत्ता पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. शाखा चेअरमन प्राचार्य पाटील म्हणाले, सर्व सल्लागार आणि कर्मचारी यांच्या सामूहिक प्रयत्नामुळेच हे यश मिळाले आहे. त्यात सातत्य राखण्यासाठी आपण प्रयत्न करू. यावेळी प्रा. डॉ. दत्ता पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी डी. के. मायदेव, शाखा सल्लागार प्रा. डॉ. दादासाहेब पाटील, मुख्याध्यापिका शमा कुरणे, शाखाधिकारी किरण कोडोळी व कर्मचारी उपस्थित होते. शाखा सल्लागार प्रा. डॉ. व्ही. के. दळवी यांनी आभार मानले.

My Kolhapur Edition
Apr 15, 2021 Page No. 9
newspaper.pudhari.co.in